# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२५ / अग्रहायण २०, १९४७ ( शके )**

(१) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री
(२) उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्ये मंत्री
(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री
(४) शालेय शिक्षण मंत्री
(५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री
(६) पणन, राजशिष्टाचार मंत्री
(७) क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास आणि औकाफ मंत्री
(८) वस्त्रोद्योग मंत्री
(९) सहकार मंत्री

} यांचे प्रभारी विभाग

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३१**

---

### राज्यात नाफेड, सीसीआयची हमीभाव केंद्र सुरु करणेसह शेतमालाला व कापसाला योग्य हमीभाव मिळणेबाबत

**(१) * १५६१७ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.अशोकराव माने (बापू) दलीतमित्र (हातकणंगले), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: जालना, कोल्हापूर, अमरावती, लातूर, अकोला, नागपूर, नांदेड जिल्ह्यात शासकीय हमीभावाने सोयाबीन खरेदी प्रक्रिया अद्याप सुरू न झाल्यामुळे बाजारपेठेत हमी भावापेक्षा कमी दराने सोयाबीन विकावे लागले असून चंद्रपूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे कपाशीचे नुकसान झाल्याने शासकीय कापूस खरेदी केंद्रे सुरु झाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र सरकारने ५,३३८ रुपये प्रति क्विंटल इतकी सोयाबीन आधारभूत किंमत निश्चित केली असताना शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये ३,८०० ते ४,००० इतक्या कमी दराने बाजारात खाजगी व्यापाऱ्यांना विक्री करावी लागत असल्यामुळे शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये १२०० ते १५०० इतक्या रकमेचे नुकसान सहन करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, केंद्र शासनाने कापसाची एमएसपी प्रतिक्विंटल रुपये ८,११० जाहिर करुनही सीसीआय (CCI) या दराने कापूस खरेदी करायला तयार नसून, सीसीआयने (CCI) जिल्हानिहाय प्रति एकर कापूस खरेदीचा कोटा ठरवून दिला असला तरी या कोटयाबाबत गोपनियता बाळगली आहे, त्यामुळे सीसीआय (CCI) शेतकऱ्यांना त्यांचा कापूस खाजगी व्यापाऱ्यांना अत्यल्प दरात विकण्यास भाग पाडत असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र शासनाने घोषित केलेल्या २६ शेतमालांपैकी ओला शेतमाल आल्यास शेतकऱ्यांना हमीभाव (एमएसपी) मिळत नाही तर अनेक ठिकाणी ओलसर शेतमाल खरेदीकरीता नाकारला जात असून सोयाबीन, तूर, मूग, ऊस या पिकांचा ओलसर शेतमाल मोठ्या प्रमाणावर येवून काही खाजगी व्यापारी याचा गैरफायदा घेऊन शेतकऱ्यांचा माल कमी दराने खरेदी करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विदर्भ सहकारी पणन महासंघ आणि महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाची खरेदीची सुरु असलेली व्यवस्था बिघडवून आता महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचा नोडल एजन्सी म्हणून समावेश करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त जिल्ह्यांसह राज्यात नाफेड, सीसीआयची हमीभाव केंद्र सुरु करणे, सोयाबीन, तूर, मुग, मका, ऊसासह कापसाला योग्य हमीभाव मिळणे व तातडीने शासकीय जिनिंग सुरु करणेबाबत तसेच मध्यप्रदेश प्रमाणे राज्यात भावांतर योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) हे खरे नाही.

केंद्र शासनाकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर राज्यात सोयाबीन, उडिद व मूग खरेदीसाठी दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ पासून नोंदणी व दिनांक १५ नोव्हेंबर, २०२५ पासून खरेदी प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. त्याकरीता नाफेड/एनसीसीएफ मार्फत दिनांक ०३ डिसेंबर, २०२५ अखेर ६१६ खरेदी केंद्रे मंजूर करण्यात आली आहेत.

तसेच हमीभावाने कापूस खरेदीसाठी सीसीआय मार्फत चंद्रपूर जिल्हयात दिनांक १५ ऑक्टोबर, २०२५ पासून १० शासकीय कापूस खरेदी केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

शेतकऱ्यांनी आणलेला कापूस सीसीआय मार्फत खरेदी केला जात असून दिनांक ०१ डिसेंबर, २०२५ पर्यंत १४.७६ लाख क्विं. कापूस खरेदी झाली. सीसीआयने FAQ गुणवत्तेच्या कापसाच्या प्रतीकरीता - रु.७४६० ते ८११० पर्यंतचे दर गुणवत्तेनुसार, तंतूची लांबी तलमता इ.नुसार ठरवून दिलेले आहेत. तसेच राज्याच्या कृषी विभागाने दिलेल्या जिल्हानिहाय दर एकरी सरासरी कापूस उत्पादनानुसार सीसीआय कडून कापूस खरेदी केली जाते. हंगाम २०२५-२६ मध्ये सीसीआयमार्फत राज्यात एकूण १६८ कापूस खरेदी केंद्र सुरु केले आहे.

राज्यात माहे ऑक्टोबर पर्यंत पाऊस असल्याने तसेच साधारणतः माहे नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत कापसातील आर्द्रता प्रमाणापेक्षा जास्त असल्याने शेतकऱ्यांमार्फत सीसीआयच्या केंद्रावर कापूस विक्री साठी आला नाही. परंतु काही शेतकऱ्यांमार्फत एफएक्यु (FAQ) पेक्षा कमी दर्जाचा कापूस खाजगी बाजार पेठेत कमी दराने विक्री झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

(४) हे अशंत: खरे आहे.

केंद्र शासनाने निश्चित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार एफएक्यु (FAQ) दर्जाचाच शेतमाल हमीभावाने खरेदी करण्यात येतो. त्याकरिता शेतमालाचा ओलावा १२ टक्के आर्द्रतेच्या मर्यादेत असणे अनिवार्य आहे.

(५) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील हंगाम २०२५-२६ मधील हमीभाव खरेदी प्रक्रीया राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई, विदर्भ सहकारी पणन महासंघ, नागपूर व महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे या नोडल संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(६) किमान आधारभूत योजनेंतर्गत हंगाम २०२५-२६ मधील कडधान्य व तेलबीयांची हमीभाव खरेदी प्रक्रीया सुरू करण्यात आली असून नाफेड/एनसीसीएफ यांच्यामार्फत दिनांक ०३ डिसेंबर, २०२५ अखेर ६१६ खरेदी केंद्रे मंजूर करण्यात आली आहे. तसेच हमीभाव योजनेचा फायदा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना व्हावा याकरीता मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी खरेदी केंद्रांची संख्या वाढविण्यात आली असून कृषी उत्पन्न बाजार समित्यांना खरेदी केंद्रे म्हणून समाविष्ठ करण्यात आले आहे.

हमीभाव कापूस खरेदीसाठी सीसीआय यांच्यावतीने खरेदी केंद्रांची संख्या वाढविण्यात आली असून दिनांक ०१ डिसेंबर, २०२५ अखेर राज्यात एकूण १६८ खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली आहेत.

-----------------

## राज्यात “मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी” योजना राबविण्याबाबत

**(२) * १६४७९ श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्राकडे प्रेरित करण्याच्या उद्देशाने “मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी” ही योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत दरवर्षी राज्यातील एकूण ५१ विद्यार्थ्यांना अमेरिकेतील “नॅशनल एरोनॉटिक्स अँड स्पेस अ‍ॅडमिनिस्ट्रेशन” नासाला भेट देण्याची संधी देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेत राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक मिळालेल्या विद्यार्थ्यांच्या विज्ञान प्रयोगाला ५१ हजार रुपये बक्षिस दिले जाणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी शालेय शिक्षण विभागामार्फत आवश्यक मार्गदर्शक सूचना व निकष तयार करून प्रथम क्रमांक विज्ञान प्रयोगाच्या बक्षिसाप्रमाणे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांच्या विज्ञान प्रयोगाला पारितोषिक देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१), (२), (३), (४) व (५) विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञानाची आवड निर्माण व्हावी, तसेच विज्ञान प्रदर्शने महाराष्ट्रात अधिक व्यापक व प्रेरणादायी होण्यासाठी “मुख्यमंत्री विद्यार्थी विज्ञान वारी” ही योजना/ उपक्रम सुरू करण्याचे प्रस्तावित आहे.

या प्रस्तावांतर्गत विज्ञान वारीकरिता निवड झालेल्या तालुका स्तरावरील २१ विद्यार्थ्यांना नागपूर, पुणे व मुंबई या पैकी एका ठिकाणच्या सायन्स सेंटरला भेट, जिल्हास्तरावर निवड झालेल्या ५१ विद्यार्थ्यांना इस्त्रो (ISRO)

येथे भेट, त्याचप्रमाणे राज्यस्तरावर निवड झालेल्या ५१ विद्यार्थ्यांना अमेरिका येथील नासा (NASA) सेंटरला भेट देण्याचा प्रस्ताव शासनामार्फत प्रस्तावित आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील गैरव्यवहाराबाबत**

**(३) * २०७८३ श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत रुपये ५१६.६५ कोटी इतक्या रकमेचा अपहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बँक आर्थिक अडचणीत असताना एकूण १३३ पदांच्या भरतीची जाहीरात काढण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पदांपैकी ९५ टक्के पद भरती बोगस झाली असून त्यामध्ये आर्थिक गैरव्यवहार झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच सदरील बँकेमध्ये मागील चार वर्षांपासून सातत्याने एनपीए वाढत असताना बँकेतील शेतकरी ठेवीदारांच्या रकमेवर उधळण सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या बँकेत आदरातिथ्यावर दोन वर्षांत ३४ लाख रुपये खर्ची घालण्यात आले असून बँकेतील संचालक, अधिकाऱ्यांच्या प्रवास खर्चाबाबत दोन वर्षांत २९ लाख रुपयांचा हिशोब दाखविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने उक्त बँकेतील संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी दिनांक ०४ ऑगस्ट, २०२५ च्या पत्रान्वये यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस एकूण १३३ पदांची भरती करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार बँकेमार्फत एकूण १३३ पदांच्या भरतीची जाहिरात दिनांक १७ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या दैनिक सकाळ, दैनिक लोकमत व दैनिक देशोन्नती या वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर बँकेच्या पदभरतीबाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे रिट याचिका दाखल झाल्या असून सद्य:स्थितीत त्या न्यायप्रविष्ट आहेत. त्यामुळे बँकेची पद भरती प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही.

(४) अंशत: खरे आहे.

मागील ४ वर्षापासून बँकेचा एन.पी.ए. वाढत आहे हे खरे आहे. तथापि बँकेचे मागील चार वर्षाचे सन २०२१-२२, सन २०२२-२३, सन २०२३-२४ व सन २०२४-२५ चे व्यवस्थापन खर्चाचे प्रमाण अनुक्रमे २.००%, १.७९%, १.५२% व १.४९% आहे. व्यवस्थापन निकषानुसार बँकेने व्यवस्थापन खर्च २ टक्केच्या आत ठेवला आहे.

(५) अंशत: खरे आहे.

सन २०२३-२४ व सन २०२४-२५ मध्ये बँकेचे संचालक यांना सभेकरीता उपस्थित राहण्याकरीता केलेल्या प्रवास खर्चावर व बैठकीच्या seating Allowance वर अनुक्रमे रु. १३,४९,६४०/- व रु. १५,०४,७३०/- असा एकूण रु.२८,५४,३७०/- खर्च झाला आहे. या खर्चामध्ये कार्यालयीन अधिकारी यांचा खर्च समाविष्ट नाही. बँकेने उपविधीनुसार समित्या स्थापित केल्या असून सदर समितीच्या सभा नियमित घेणे बँकेला अनिवार्य आहे.

(६) बँकेने आदरातिथ्य व प्रवासखर्चावर केलेल्या खर्चासंबधाने बँकेच्या सन २०२३-२४ व २०२४-२५ या लेखापरिक्षण अहवालात व नाबार्डच्या सन २०२३-२४ च्या तपासणी अहवालात प्रतिकूल शेरे नाहीत. तथापि, बँकेने केलेल्या सदर खर्चाची सत्यता तपासणी करण्याकरीता विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती कार्यालयाकडून दिनांक २८ नोव्हेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, यवतमाळ यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## सांगोला (जि.सोलापूर) तालुक्यातील गावांना म्हैसाळ उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत पाणी वाटप करण्याबाबत

**(४) * १६५६१ डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगोला तालुक्यातील (जि.सोलापूर) ११ गावे म्हैसाळ उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत येत असून सांगोला तालुक्याचा काही भाग म्हैसाळ योजनेच्या शेवटी येत असल्याने पाणी पुरवठा अतिशय कमी दाबाने होत असल्यामुळे शेतकऱ्यांना पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगोला तालुका हा राज्यातील कायम दुष्काळग्रस्त व पाणीटंचाईचा सामना करणारा तालुका असून येथे पर्जन्यमान कमी असल्याने शेती व पिण्याच्या पाण्यासाठी उपयुक्त स्त्रोतांचा नेहमीच अभाव जाणवतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हैसाळ योजनेद्वारे कोरडा नदी व त्यावरील बंधारे भरून देण्याकरीता अंदाजित ३.०० दशलक्ष घनफूट पाण्याची आवश्यकता असून जत कालव्यातून पाणी बंदिस्त नालिकेद्वारे देण्याची तरतूद झाल्यास तेथील गावांना पिण्याचे पाणी, शेतीसाठी व पशुधनासाठी लागणाऱ्या पाण्याची कमतरता नष्ट होऊ शकते, सदर योजनेतून कोरडा नदीवरील १५ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बंदिस्त पाईपलाईनद्वारे म्हैसाळ योजनेच्या जत कालव्यावरून पाणी देण्याची तरतूद करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, म्हैसाळ उपसा सिंचन योजनेद्वारे काही भागांना पाणी मिळत असले तरी मौजे डिकसळ येथील काही भाग अजूनही पाणीटंचाईने त्रस्त आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, नरळे, हंगेरगी व पारे येथील साठवण तलावात पाणी सोडण्यासाठी असलेल्या बंदिस्त नलिका अतिशय छोट्या असल्याने या नलिकांद्वारे हे साठवण तलाव भरण्यासाठी अधिक काळ लागत असून सदर परिसरातील नागरिकांना व जनावरांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होत नसल्यामुळे टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त सर्व गावांना पाणी पुरवठा करणाऱ्यासह कोरडा नदीवरील १५ कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बंदिस्त पाईपलाईनद्वारे म्हैसाळ योजनेच्या जत कालव्यावरून पाणी देण्याची तरतूद करण्याबाबत तसेच नरळे, हंगेरगी व पारे येथील साठवण तलावात मुख्य कालव्यातून थेट बंदिस्त नलिकांद्वारे पाणी सोडण्याची तरतूद करुन वाढीव पाईपलाईन टाकून दाब व प्रवाहामध्ये वाढ करून अधिक कार्यक्षम आणि समतोल पाणी वाटप करण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

सांगोला तालुक्यातील (जि.सोलापूर) ८ गावे म्हैसाळ उपसा सिंचन प्रकल्पांतर्गत लाभक्षेत्रात येतात.

म्हैसाळ उपसा सिंचन योजनेची कामे टप्प्या-टप्प्याने पूर्ण करणेत येवून लाभक्षेत्र माहे डिसेंबर, २०२३ मध्ये निर्मित झाले आहे, त्याद्वारे लाभक्षेत्रात पाण्याचे वितरण करणेत येत आहे.

(३) सांगोला तालुक्यातील आगलावेवाडी को.प.बंधारे पासून वाडेगाव पर्यंत कोरड्या नाल्यातील एकूण १५ को.प.बंधाऱ्यामध्ये जत मुख्य कालव्यामधून थेट बंदिस्त नलिका वितरण करुन पाणी सोडण्याच्या प्राथमिक अहवालाची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) होय, हे खरे आहे.

म्हैसाळ उपसा सिंचन योजनेद्वारे सांगोला तालुक्यातील लाभक्षेत्रातील ८ गावांतील ४००० हे. क्षेत्रास सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे. मौजे डिकसळ येथील ६२७ हे. इतके क्षेत्र लाभक्षेत्रात समाविष्ट आहे.

(५) व (६) हे खरे नाही.

कृष्णा कोयना उपसा सिंचन योजनेच्या पाचव्या सुप्रमा अहवालात सांगली व सोलापूर जिल्ह्यातील साठवण तलाव / ल.पा. तलावात अंशत: पाणी देणेसाठी १ अघफू पाण्याची तरतूद केली आहे. त्याद्वारे नरळे, हंगेरगी व पारे येथील साठवण तलावात अंशत: (१५ ते २०%) पाणी सोडण्याचे प्रस्तावित असून कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे. या प्रकरणी विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यात शाळांमध्ये अध्यापनासाठी वर्तुळाकार बैठक पध्दतीचा अवलंब करण्याबाबत

**(५) * १६०५३ श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या तसेच अनुदानित व विनाअनुदानित सर्वच शाळांमध्ये अध्यापनासाठी वर्गात एका मागोमाग एक बाक लावून शिकविण्याची पारंपरिक रचना प्रचलित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा बाक रचनेच्या पद्धतीमुळे पाठीमागे बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात "बॅकबेंचर" असा न्यूनगंड निर्माण होत असल्याचे वेळोवेळी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राहुरी नगरपालिकेच्या (जि.अहिल्यानगर) प्राथमिक शाळांमध्ये या पारंपरिक रचनेऐवजी वर्तुळाकार बैठक पद्धतीचा अवलंब करून 'केरळ पॅटर्न' नुसार विद्यार्थी-केंद्रित संवादात्मक शिक्षणाचा प्रयोग यशस्वीपणे राबविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा प्रकारची बैठक रचना केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संवादकौशल्य, आत्मविश्वास आणि समवेत शिकण्याची सकारात्मकता वाढते हे प्रत्यक्ष निरीक्षणातून दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने विद्यार्थ्यांच्या समतोल सहभागासाठी आणि शिक्षणातील गुणवत्तावाढीसाठी सर्व शाळांमध्ये अशा वर्तुळाकार बैठक रचनेची अंमलबजावणी करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

बहुतेक शाळांमध्ये चक्राकार पद्धतीने विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था केली जाते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांची जागा सुरुवातीला किंवा शेवटी असेलच असे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

राहुरी नगरपालिका शिक्षण मंडळाच्या मराठी माध्यमाच्या १२ आणि उर्दू माध्यमाची १ अशा एकूण १३ शाळा आहेत. यातील नूतन मराठी शाळा, नंबर ९, येवले वस्ती या शाळेत वर्तुळाकार बैठक व्यवस्था अवलंबली आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) बहुवर्ग शाळांमध्ये किंवा अधिक पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये जागेअभावी विद्यार्थ्यांसाठी वर्तुळाकार बैठक व्यवस्थेची अंमलबजावणी कशाप्रकारे करता येईल ही बाब देखील तपासणे आवश्यक आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेबाबत

**(६) * १५६७६ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.विठ्ठल लंघे (नेवासा), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" दिनांक ९ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेत १२ वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रतिमाह ६ हजार, आयटीआय अथवा पदविका प्राप्त प्रशिक्षणार्थींना ८ हजार व पदवी तसेच पदव्युत्तर पदवी प्राप्त झालेल्यांना १० हजार रुपये विद्यावेतन त्यांच्या बँक खात्यात थेट जमा केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेंतर्गत राज्याच्या विविध आस्थापनांमध्ये अकरा महिने कार्यप्रशिक्षण घेतलेल्या राज्यातील १ लाख ३४ हजार सुशिक्षित बेरोजगारांवर उपासमारीची वेळ आल्याचे दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेतील प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर रोजगार देण्याचे आश्वासन शासनाकडून देण्यात येवूनही रोजगार देण्यात आला नाही. तसेच काही प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीतील मानधन देखील देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर सुशिक्षित बेरोजगारांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी संघटना, अकोला व श्री.संत बागडे बाबा मानवमित्र संघटना (म.रा) यांच्यावतीने विविध सरकारी आस्थापनांमध्ये कायम नोकरीत सामावून घेऊन प्रशिक्षणार्थींचे रुजू दिनांकापासून वय ग्राह्य धरले जावे इ. मागण्यांसदर्भात दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढून धरणे आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार देण्याबाबत व त्यांच्या इतर मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) दिनांक ०९ जुलै, २०२४ च्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत शासकीय /निमशासकीय /खाजगी आस्थापनांमध्ये कार्यप्रशिक्षण घेत असलेल्या १२ वी उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांना प्रतिमाह ६ हजार, आयटीआय अथवा पदविका प्राप्त प्रशिक्षणार्थ्यांना ८ हजार व पदवी तसेच पदव्युत्तर पदवी प्राप्त झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना प्रतिमाह १० हजार रुपये विद्यावेतन अदा करण्यात येते.

(३) व (४) मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेंतर्गत दिनांक ३० नोव्हेंबर, २०२५ अखेर रुजू झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या १,१६,३८४ इतकी आहे. प्रस्तुत योजनेंतर्गत युवकांना शासकीय /निमशासकीय /खाजगी आस्थापनांत कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर बाब ही नियुक्ती नसून केवळ प्रशिक्षणाची संधी आहे. दिनांक १० मार्च, २०२५ च्या शासन निर्णयान्वये या योजनेंतर्गत कार्यप्रशिक्षणाचा कालावधी ६ महिन्यांवरुन ११ महिने इतका वाढविण्यात आला आहे.

प्रस्तुत योजनेंतर्गत ११ महिन्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर कार्यरत प्रशिक्षणार्थ्यांच्या जागी नवीन उमेदवारांना कार्यप्रशिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्यात येते. प्रशिक्षणार्थ्यांचे मानधन देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) राज्यातील १५ ते ४५ वर्षे वयोगटातील उमेदवारांना अत्याधुनिक तंत्रज्ञानानुरुप कौशल्य प्रशिक्षणाच्या आधारे रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने कौशल्य विकास कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. सदर कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे. सदर सोसायटीमार्फत राज्यातील उमेदवारांना विविध क्षेत्रातील अभ्यासक्रमांचे सूचीबद्ध प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून अल्पमुदतीचे प्रशिक्षण देवून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येतात. तसेच, सोसायटीमार्फत प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, प्रमोद महाजन-ग्रामीण कौशल्य केंद्र व आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ह्या योजना राबविण्यात येत आहेत.

सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार/ स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी नियोक्ते कारखानदार, व्यापारी व सुशिक्षित बेरोजगार यांना संयुक्त व्यासपीठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनामार्फत रोजगार मेळावे आयोजित करण्यात येतात. त्याकरीता नोकरीसाठी इच्छुक उमेदवारांची तसेच नियोक्त्यांच्या नोंदणीसाठी विभागामार्फत ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

दिनांक २८ ऑगस्ट, २०२४ च्या शासन निर्णयान्वये बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायट्यांना रु.१०.०० लक्ष पर्यंतची कामे विना निविदा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता दिनांक ०९ जुलै, २०२४ च्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना" कार्यान्वित करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### राज्यातील खाजगी विनाअनुदानित संस्थांनी शैक्षणिक शुल्कात वाढ केल्याबाबत

**(७) * १५६५५ श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.शंकर जगताप (चिंचवड), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विनाअनुदानित संस्थांच्या आर्थिक फायद्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) स्वतःच्या नियमाचे उल्लंघन करुन राज्यातील ६९५ खाजगी विनाअनुदानित संस्थांना सन २०२५-२६ या वर्षाच्या शुल्कात वाढ करण्याची परवानगी दिल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक वर्षामध्ये शुल्कवाढ करण्यासाठी ३१ ऑक्टोबरपर्यंत एफआरएकडे प्रस्ताव सादर करणे व अशा प्रस्तावांना एफआरएने ३१ मार्चपर्यंत मान्यता देणे बंधनकारक असताना एफआरएने शुल्कवाढीच्या प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी ३१ मार्चनंतर दिनांक २ एप्रिल ते २३ जुलै, २०२५ या कालावधीत सुमारे ४० बैठका घेऊन ६९५ विनाअनुदानित संस्थांना शुल्कात बेकायदा वाढ करण्याची परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा महाविद्यालयांकडून डेव्हलपमेंट फंड, परिसर मेन्टेनन्स फी, लॅब अपग्रेडेशन फी अशा नावाखाली विद्यार्थ्यांकडून जास्त शुल्क आकारण्यात येत असल्याच्या तक्रारी दिनांक १५ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पालक व विद्यार्थ्यांकडून करण्यात येऊनही शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने एफआरएने माहे ऑक्टोबरनंतर शुल्कवाढीस मान्यता दिलेल्या ६९५ महाविद्यालयांचे प्रस्ताव रद्द करून त्यांना मागील शैक्षणिक वर्षाच्या शुल्क मान्यतेप्रमाणे शुल्क आकारणी करण्यासह याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या एफआरएच्या संबंधित अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) हे खरे आहे.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम १४ (१) (क) नुसार संस्थांनी ३१ ऑक्टोबर पर्यंत शुल्क नियामक प्राधिकरणाकडे प्रस्ताव सादर करणे बंधनकारक आहे. परंतु, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२४ या मुदतीनंतर बऱ्याच महाविद्यालयांचे लेखा परिक्षण अहवाल तयार झाले नसल्याने किंवा संस्थांना येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे प्रस्ताव सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत विनंती अर्ज प्राप्त झाले. त्यानुसार, प्राधिकरणाकडून संस्थांना प्रस्ताव दाखल करण्याकरिता मुदतवाढ देण्यात आली. संबंधित संस्थानी प्राधिकरणाकडून शुल्क निश्चिती करुन घेतली नसल्यास, त्यांचे शुल्क महाडिबीटीवर मान्य होत नाही व त्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याकरीता अडचणी निर्माण होतात. सदर बाब लक्षात घेऊन प्राधिकरणाने संस्थांना शुल्क निश्चितीचे प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ दिलेली आहे.

सदर मुदतवाढीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने शुल्क नियामक प्राधिकरणाने शुल्कनिश्चिती केल्यानुसार काही संस्थांच्या शुल्कामध्ये वाढ झालेली आहे.
(३) प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा महाविद्यालयांकडून डेव्हलपमेंट फंड, परिसर मेन्टेनन्स फी, लॅब अपग्रेडेशन फी अशा नावाखाली विद्यार्थ्यांकडून जास्त शुल्क आकारण्यात येत असल्याबाबतच्या विशिष्ट तक्रारी प्राधिकरणाकडे प्राप्त झालेल्या नाहीत.

तथापि, शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क संस्थांनी आकारल्यास, याबाबत हितसंबंधीत घटक विद्यार्थी / पालक यांनी पुराव्यासह तक्रार दाखल केल्यास प्राधिकरण स्तरावर तक्रार निवारण समिती मार्फत चौकशी करण्यात येते. तक्रारीमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांविरुध्द नियमानुसार कार्यवाही करण्यात येते.
(४) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम १४ (१) (क) नुसार संस्थांना प्रस्ताव सादर करण्यासाठी ३१ ऑक्टोबर ही मुदत दिलेली आहे. परंतु, विद्यार्थ्यांचे हित व काही तांत्रिक बाबींचा विचार करुन, अधिनियमाच्या कलम २० नुसार दिनांक २९ जानेवारी,

२०२५ नंतर संबंधित संस्थांकडून प्राप्त झालेल्या शुल्क निश्चितीबाबतच्या प्रस्तावांच्या मुदतवाढीबाबत प्राधिकरणाकडून दंडात्मक कारवाई करुन निर्णय घेण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपी (FRP) नुसार मोबदला देण्याबाबत**

**(८) * १९४५२ श्री.हिकमत उढाण (घनसावंगी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना विशेषत: मौजे महाकाळा (ता.अंबड, जि.जालना) येथील समर्थ सहकारी साखर कारखाना सन १९८२ पासून कार्यरत असून व्यवस्थापनाने अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या ऊस देयकातून बेकायदेशीररित्या विविध कारणांनी कपात केल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या दर कपातीविरोधात अनेक वर्षे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी वेळोवेळी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणे व आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात ऊस दराबाबत शासनाने निश्चित धोरण ठरविले नसल्यामुळे शेतकऱ्यांना एफआरपी (FRP) नुसार मोबदला कारखानदार देत नाहीत तसेच ऊस तोडणी नंतर शेतकऱ्यांना तात्काळ पैसे /चुकारा/ हप्ता दिला जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन १९८२ पासून ते आजपर्यंत विविध मार्गांनी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची एफआरपी (FRP) रक्कम थकित ठेऊन आर्थिक नुकसान झाले असताना देखील गाळप हंगामास मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने सदर शेतकऱ्यांना अनेक वर्षांपासून ऊसाचा मोबदला न देणाऱ्या कारखानदारांविरुध्द कारवाई करण्यासह राज्यातील शेतकऱ्यांना एफआरपी (FRP) नुसार मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.
सदर ठेवीच्या कपाती या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ठरावाद्वारे मान्यता घेऊन कपात करण्यात आलेल्या आहे. त्यामुळे त्यांना बेकायदेशीर ठरविता येणार नाही.
(२) अंशत: खरे आहे.
शेतकऱ्यांनी सदरच्या कारखाना स्थळावर उपोषण व आंदोलन केलेले आहे.
(३) नाही, हे खरे नाही.
गाळप हंगाम सन २०२४-२५ करीता केंद्र शासनाने दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४ च्या पत्राद्वारे FRP अदा करण्यासंदर्भात धोरण जाहीर केलेले आहे.
(४) अंशत: खरे आहे.
गाळप हंगाम सन २०२५-२६ गाळप परवाना देण्यात आलेला आहे.तथापि ऊस उत्पादक शेतकऱ्यांची एफआरपी ( FRP) रक्कम थकित ठेवण्यात आलेली नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अल्पसंख्याक आयुक्तालयाकरिता आकृतीबंधानुसार अधिकारी/कर्मचारी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(९) * १५८४९ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २०% वाटा असलेल्या मुस्लिम, जैन, शीख, ख्रिस्ती, पारसी, ज्यु, बौद्ध आदी अल्पसंख्याक समाजाला मुख्य प्रवाहात आणणे, त्यांना विविध योजनांचा लाभ देणे, शैक्षणिक, सामाजिक मागासलेपण दूर करणे अशा उद्देशाने अल्पसंख्याक आयुक्तालयाची घोषणा दिनांक १२ मार्च, २०२४ रोजी वा त्यादरम्यान मंत्रीमंडळ बैठकीत केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अल्पसंख्याक आयुक्तालयाचे मुख्यालय छत्रपती संभाजीनगर येथे स्थापन झाले असून, आयुक्तालयासाठी एक आयएएस अधिकारी व इतर ३५ अधिकारी, कर्मचारी असा पदांचा आकृतीबंध शासन निर्णयाद्वारे निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अल्पसंख्याक आयुक्तालय हे देशातील पहिले आयुक्तालय असले तरी अद्यापपर्यंत याठिकाणी एक आयुक्त, एक शिपाई, एक कर्मचारी बाह्यस्त्रोतातून उसनवारीने काम करत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आयुक्तालयाचे कार्यालयात मनुष्यबळाअभावी कामकाज होत नसल्याच्या अनेक तक्रारी अल्पसंख्याक समाजाकडून होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अल्पसंख्याक आयुक्तालयाचे कामकाज सुरळीत होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) अल्पसंख्याक आयुक्तालयामध्ये आयुक्त हे संवर्गपद असून या पदावर भा.प्र.से. संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सहायक आयुक्त पद अतिरिक्त कार्यभाराने, १ अधिक्षक, १ वरिष्ठ लिपिक, २ लिपिक व १ शिपाई पद उसनवारी तत्वावर नियुक्त केले आहेत.
उर्वरित पदे प्रतिनियुक्तीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (TET) अनिवार्य करण्यात आल्याबाबत

**(१०) * १५७०६ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अबू आझमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या निर्णयानुसार प्राथमिक शिक्षकांसाठी शिक्षक पात्रता परीक्षा (TET) अनिवार्य करण्यात आलेली असून राज्य शासनाच्या दिनांक ३० जून, २०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार दिनांक १३ डिसेंबर, २०१३ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षकांसाठी सेवेत कायम करणे व पदोन्नतीसाठी TET परीक्षा आवश्यक करण्यात आलेली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबत काही राज्यांकडून पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण विभागाने आयोजित केलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा (TET), २०२५ मध्ये तांत्रिक/प्रशासकीय अडचणींमुळे २०२४ मध्ये अनुत्तीर्ण झालेले विद्यार्थी आणि २०२५ मध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी या दोन्ही वर्षांचे विद्यार्थी शिक्षक पात्रता परीक्षा (TET), २०२५ परीक्षेच्या संधीपासून वंचित राहिले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षकांना शिक्षक पात्रता परिक्षा (TET) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी द्यावा, शिक्षकांना परीक्षेसाठी पुरेसा वेळ मिळावा याकरिता सर्व प्रकारच्या अशैक्षणिक कामातून शिक्षण विभागाने मुक्त करावे, परीक्षेची तयारी करणाऱ्या प्रत्येक शिक्षकास सहा महिन्यांची विशेष रजा मंजूर करावी, पात्रता संपादन करण्यास अपयश आले तर शिक्षकांना दोन वर्षानंतर डिम्ड क्वालिफाईड समजण्यात यावे अशा विविध मागण्या शिक्षक संघटनांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) तसेच, इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभागाने दिनांक १७ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान जारी केलेल्या आदेशानुसार दोन वर्षांच्या आत परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या शिक्षकांना सक्तीची निवृत्ती देण्याचा उल्लेख आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या न्यायनिर्णयानुसार इयत्ता १ ली ते ८ वी साठी नियुक्त असलेल्या व ज्याचा सेवा कालावधी ५ वर्षाहून अधिक शिल्लक आहे अशा बिगर अल्पसंख्याक शाळातील सर्व कार्यरत शिक्षकांना २ वर्षे कालावधीच्या मुदतीत टीईटी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. ५ वर्षाहून कमी सेवा कालावधी शिल्लक असलेल्या शिक्षकांना यातून सूट देण्यात आली असली तरी पदोन्नतीसाठी त्यांना सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने निश्चित केलेल्या मानंकानुसार राज्यात दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात आले आहे. दिनांक ३० जून, २०१६ च्या परिपत्रकान्वये दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षकांनी सदर परीक्षा उत्तीर्ण व्हावी यासाठी तीन संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या. तथापि, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयानुसार आता सर्व शिक्षकांना सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दिनांक ३१ ऑगस्ट, २०२६ पर्यंतची मुदत आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाविरुध्द काही राज्यांनी पुनर्विलोकन याचिका दाखल केली आहे किंवा कसे याबाबत अधिकृत माहिती उपलब्ध नाही.
(२) टीईटी परीक्षेत अपात्र ठरलेल्या उमेदवारास पुढील परीक्षा देण्याची मुभा आहे. शिवाय पात्र ठरलेला उमेदवार वाढीव गुणांसाठी पुनश्च परीक्षा देऊ शकतो. त्यामुळे टीईटी-२०२५ परीक्षेच्या संधीपासून उमेदवार वंचित राहिले असल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(३) शिक्षक संघटनांनी या संदर्भात मागण्या केल्या आहेत. शिक्षकांवरील अशैक्षणिक कामाचे ओझे कमी करण्याबाबत दिनांक २३ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये आवश्यक तरतूदी करण्यात आल्या आहेत. शिक्षकांना अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून वर्षातून दोन वेळा टीईटी परीक्षा घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) इतर मागास बहुजन कल्याण विभागाने मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयानुसार असे पत्र निर्गमित केल्याचे दिसून येते. तथापि, त्या विभागाने सदर पत्र दिनांक २० नोव्हेंबर, २०२५ रोजी अधिक्रमित करण्यात आले आहे.

(५) टीईटी परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य असल्याची बाब केंद्र शासनाच्या व राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या अखत्यारीतील बाब आहे. याबाबत राज्यास हस्तक्षेप करता येत नाही. सबब, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणी करावयाच्या पुढील कार्यवाहीसंदर्भात केंद्र शासनाकडून व राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेकडून मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. शिवाय मा. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाविरुध्द पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यास विधि व न्याय विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्या विभागाने सदर प्रकरण पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यास योग्य नसल्याचे अभिप्राय दिले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हापरिषदेच्या शाळांची झालेली दुरवस्था

**(११) * १५५८४ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हिकमत उढाण (घनसावंगी), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), डॉ.तानाजी सावंत (परांडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: अमरावती, जालना, नंदुरबार, पालघर, यवतमाळ, गोंदिया, बुलढाणा, नागपूर, नाशिक, लातूर, धाराशिव व इतर अनेक जिल्ह्यांतील शासकीय व जिल्हा परिषद शाळांपैकी अनेक शाळा मोडकळीस आल्याचे, मुलींना स्वच्छता गृह नसणे, विजेची वायरींग धोकादायक स्थितीत असल्याने विद्यार्थ्यांचा सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याच्या घटना माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा या हिंस्त्र वन्यप्राणी असलेल्या जंगला शेजारी, तलावांच्या काठावर, डोंगराळ भागात असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापही उक्त जिल्ह्यांतील शाळांसाठी निधी उपलब्ध न झाल्यामुळे पायाभूत सुविधांची कामे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शाळांच्या अत्यंत जीर्ण अवस्थेमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात असल्याचे विविध जिल्ह्यांतील पाहणीत तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींच्या लेखी तक्रारींमध्ये नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासह शाळांच्या देखभाल व दुरुस्ती इ.साठी निधी उपलब्ध करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अशंत: खरे आहे.

(२) अशंत: खरे आहे.

जिल्ह्यातील देवरी, अर्जुनी/मोर, सालेकसा हे तालुके आदिवासी बहुल, नक्षलग्रस्त भागात असून काही परिसर डोंगराळ आहे तसेच काही शाळा ह्या तलावाच्या काठावर आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) शाळांच्या मूलभूत सोयी-सुविधांकरीता आवश्यकतेनुसार जिल्हा नियोजन समिती, मनरेगा, सेस निधी, क्रीडा विभाग निधी, स्थानिक विकास निधी, सेवाभावी संस्था, समाज कल्याण, आदिवासी विकास विभाग, सिएसआर, गौणखणिज, लोकसहभाग, जलजीवन मिशन, १४ वा / १५ वा वित्त आयोग, इ.माध्यमांतूनही निधीची तरतूद दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या पी.ई.टी. (पीएचडी) प्रवेश परिक्षेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१२) * १९५६० श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातून पीएचडी पूर्ण करण्यासाठी पीईटी (प्रवेश परीक्षा) परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा कालावधी संपुष्टात येण्याची वेळ आली तरी त्यांना मार्गदर्शक मिळाला नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मार्गदर्शकाअभावी विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा देण्याची वेळ येणार असून शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मार्गदर्शकासाठी अर्ज केलेल्या जवळपास २१ प्राध्यापकांना विद्यापीठाने मागील दोन वर्षांपासून मान्यताच दिली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन पीएचडी पूर्ण करण्यासाठी पीईटी (प्रवेश परीक्षा) परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही. मुंबई विद्यापीठाची पी.ई.टी. (पीएचडी प्रवेश परिक्षा) माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये घेण्यात आली होती. त्याचा निकाल माहे डिसेंबर, २०२४ मध्ये घोषित करण्यात आला व त्या निकालाची वैधता पीएचडी प्रवेशासाठी एक वर्ष (डिसेंबर, २०२५ पर्यंत) आहे. पीईटी परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर परिक्षेत मिळालेले गुण व मुलाखतीच्या वेळी मिळालेले गुण हे एकत्रित करुन तसेच मार्गदर्शक (गाईड) आणि संशोधन केंद्रावरील पी.एच.डी. जागा यांच्या उपलब्धतेनुसार पीएचडीसाठी प्रवेश संबंधित संशोधन केंद्रावर दिले जातात. पी.ई.टी. परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर पी.एच.डी. प्रवेशाची सुनिश्चिती नसते व तसे पी.एच.डी. च्या नोटिफिकेशनवर स्पष्टपणे नमूद केलेले असते.

(३) व (४) हे अंशत: खरे आहे. शैक्षणिक वर्षे २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये ६१३ इतके अतिरिक्त नवीन मार्गदर्शक विविध विषयांमध्ये मिळून उपलब्ध करुन देण्यात आले. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नवीन नियमावलीनुसार नमूद केलेल्या २१ प्राध्यापकांसह अजून नवीन मार्गदर्शक उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया सुरू आहे. नवीन मार्गदर्शकांना मान्यता मिळणे ही एक निरंतर सुरू असणारी प्रक्रिया असून ती पी एच.डी. प्रवेशाच्या सुनिश्चितीशी संबंधीत नसते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मराठी माध्यमाच्या बंद पडलेल्या प्राथमिक शाळा सुरु करणेबाबत

**(१३) * १६६०३ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका (TMC) क्षेत्रात गेल्या सात वर्षांच्या कालावधीत एकूण १८ मराठी प्राथमिक शाळा बंद पडल्या असल्याचे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनाद्वारे दिनांक ६ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांची घटती संख्या, पालकांचा इंग्रजी माध्यमाकडे वाढलेला ओढा किंवा मराठी शाळांना प्रोत्साहन देण्यासाठी शासकीय धोरणांचा अभाव इत्यादी कारणांमुळे मराठी शाळा बंद पडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मराठी माध्यमाचे महत्त्व टिकवून ठेवण्यासाठी आणि बंद पडलेल्या शाळा पुन्हा सुरू करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी शासनामार्फत कोणती विशेष कृती योजना (Special Action Plan) आखण्यात आलेली आहे वा येत आहे,

(४) असल्यास, काही ठिकाणी मराठी माध्यमाच्या शाळांच्या खोल्यांमध्ये इंग्रजी माध्यमाचे वर्ग भरविले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल वर्गखोली (Digital Classrooms), सुसज्ज प्रयोगशाळा व क्रीडांगणे यांसारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पालकांमध्ये मराठी शिक्षणाचे महत्त्व आणि मातृभाषेतून शिक्षणामुळे होणारे बौद्धिक व मानसिक फायदे याबाबत जनजागृती मोहीम राबवण्यासाठी शासनामार्फत उपाययोजना करण्यासह बंद पडण्यात येत असलेल्या मराठी शाळा सुरु राहण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

ठाणे महानगरपालिकेतंर्गत संचलित मराठी माध्यमाच्या शाळांपैकी १० शाळांचे विद्यार्थी पटसंख्या कमी झाल्याने नजीकच्या मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये विलीनीकरण केले आहे. सदर शाळांमधील विद्यार्थी तसेच शिक्षकांचे देखील समायोजन करण्यात आले आहे. तसेच, एक शाळा विद्यार्थी पटसंख्या शून्य झाल्याने व एका शाळेची इमारत धोकादायक स्थितीत असल्याने बंद करण्यात आली आहे.

(२) व (३) अंशतः खरे आहे.

ठाणे महानगरपालिका अंतर्गत वाढलेले शहरीकरण, नोकरी, व्यवसाय इत्यादींमध्ये निर्माण होणाऱ्या संधी याकरीता बहुसंख्य पालकांचा, आपल्या पाल्यास इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणेचा कल अलिकडे वाढलेला असून ठाणे महानगरपालिका अंतर्गत मराठी माध्यमाच्या शाळांमधील प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होत आहे.

परंतु, मराठी माध्यमातील शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या टिकवून ठेवणेसाठी विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. ठाणे महानगरपालिकेने विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान प्राप्त करून देण्याकरीता सर्व शाळांमधील बहुसंख्य वर्गखोल्या आधुनिक तंत्रज्ञानयुक्त डिजिटल केल्या आहेत. विद्यार्थ्यांना खेळण्याकरीता क्रीडांगणे, त्याचप्रमाणे पोषण आहार, मोफत शैक्षणिक साहित्य, गणवेश इ. विविध कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून विद्यार्थी संख्या वाढविणेसाठी प्रयत्न केले जात आहेत. त्याचप्रमाणे शैक्षणिक व इतर गुणवत्ता वाढीसाठी रोबोटिक प्रशिक्षण, विज्ञान मंच, बालरंगकर्मी योजना, चला करु या नाटक इ. योजनांच्या माध्यमातून

विद्यार्थी पटसंख्या टिकवून ठेवणेसाठी प्रयत्न केले जात आहेत. तसेच शाळांमध्ये पालक सभा आयोजित करून पालकांचे उद्बोधन व समुपदेशन केले जात आहे.

(४) हे खरे नाही.

ठाणे महानगरपालिकेंतर्गत सुरू असलेल्या ७ इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये त्याच इमारतीमधील वर्गखोल्यांचे दोन सत्रात नियोजन करून इंग्रजी माध्यमाच्या शाळांबरोबर मराठी व उर्दू माध्यमाच्या शाळा भरत आहेत.

(५) ठाणे महानगरपालिकेने मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित ज्ञान देण्याकरीता शाळांमधील ४०५ वर्गखोल्यांमध्ये डिजिटल क्लासरूम, २९ शाळांमध्ये सुसज्ज संगणक प्रयोगशाळा, विज्ञान प्रयोगशाळा, १० शाळांमध्ये डिजिटल वाचनालय इत्यादी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

तसेच, शालेय पोषण आहार, मोफत गणवेश, शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी विद्यार्थ्यांना थेट अनुदान, विज्ञान मंच (शैक्षणिक सहल), स्काऊट-गाईड प्रशिक्षण, बालरंगकर्मी योजना, चला नाटक करूया इत्यादी योजनांच्या माध्यमातून विद्यार्थी पटसंख्या टिकवून ठेवणेसाठी प्रयत्न केले जात आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अक्कलकुवा व धडगाव (जि.नंदुरबार) तालुक्यातील प्रलंबित जलसिंचन प्रकल्प पूर्ण करून प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत

**(१४) * १७६९१ श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी व डोंगरी भागातील शेतीस चालना देण्यासाठी व शेतकऱ्यांना पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने अक्कलकुवा तालुक्यात (जि.नंदुरबार) प्रमपूर, देहली व धडगाव तालुक्यातील जलोळा हे महत्त्वाचे जलसिंचन प्रकल्प राबविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांपैकी प्रमपूर लघुप्रकल्प व देहली प्रकल्प वर्षानुवर्षे निधी अभावी प्रलंबित आहेत व त्यामुळे शेकडो विस्थापितांचे पुनर्वसनही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच उक्त देहली प्रकल्पात १०२ भूमीहीन प्रकल्पग्रस्तांना अद्यापही 'स्वाभिमान समाकलन योजने' अंतर्गत जमिनी व घरासाठी प्लॉट देण्यात आले नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने सदरहू प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, खरे आहे.

ता.अक्कलकुवा, जि.नंदुरबार मधील मध्यम प्रकल्प देहली व रामपूर ल. पा. योजना प्रगतीपथावर असून धडगाव तालुक्यात प्रस्तावित नर्मदा तापी वळण योजनेतंर्गत जलोला धरण प्रस्तावित आहे.

(२) हे खरे नाही.

प्रकल्पांसाठी पुरेसा निधी उपलब्ध आहे.

(i) देहली मध्यम प्रकल्पाचा पाणीसाठा १००% झाला असून मुख्य कालव्याचे काम पूर्ण झाले आहे, वितरण व्यवस्थेचे काम प्रगतीत आहे.

देहली मध्यम प्रकल्पांतर्गत ६३९ विस्थापित कुटुंबांचे आवश्यक सोयी सुविधांसह पुनर्वसन करुन पुनर्वसित गावे स्थानिक स्वराज्य संस्थेकडे पुढील देखभाल व दुरुस्तीसाठी दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२२ रोजी हस्तांतरीत करण्यात आलेली आहेत.

(ii) रामपूर ल. पा. योजनेचे काम ७५% पूर्ण झाले असून उर्वरीत काम प्रगतीत आहे. रामपूर ल. पा. योजनेमध्ये विस्थापितांचे पुनर्वसन नाही.

(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

स्वाभिमान सबळीकरण योजनेतंर्गत आदिवासी लाभार्थींना शेती करण्यासाठी जमीन उपलब्ध करुन देण्यात येते. त्यांना घरासाठी प्लॉट देण्यात येत नाही. याकरिता करावयाच्या कार्यवाही अंतर्गत जमीन उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कपिलधारवाडी (ता.जि.बीड) या गावाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१५) * ११९१८५ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पाली येथील ग्रामपंचायत हद्दीत येत असलेल्या कपिलधारवाडी (ता.जि.बीड) या गावात अतिवृष्टीमुळे भुस्खलन होऊन जमिनी, रस्ते, घरे, शाळा, मंदिरे, संरक्षण भिंत आदिंना मोठ्या प्रमाणात तडे गेल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावात ९० कुटुंबे वास्तव्य करित असून भुस्खलनामुळे ग्रामस्थांना मन्मथ स्वामी देवस्थान, कपिलधारवाडी या ठिकाणी स्थलांतर करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भूस्खलनामुळे संपूर्ण गावाचे तात्काळ स्थलांतर योग्य ठिकाणी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री यांचेकडे दिनांक २७ ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त गावाची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, सदर पाहणीच्या अनुषंगाने सदरहू गावाचे तातडीने पुनर्वसन करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची पर्यायी व्यवस्था व गावाला सुस्थितीत आणण्याकरिता विविध योजनेंतर्गत निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्याकडे दिनांक ३ सप्टेंबर, २०२५ रोजी निवेदन दिले आहे.

(४) संचालक, वरिष्ठ भूवैज्ञानिक, भारतीय भूगर्भ सर्व्हेक्षण विभाग, पुणे यांनी दिनांक ८ ऑक्टोबर, २०२५ रोजी मौ. कपिलधारवाडी, ता. बीड या भूस्खलनग्रस्त भागामध्ये सर्व्हेक्षण करून नागरिकांचे पुनर्वसन करणे आवश्यक असल्याचा अहवाल सादर केलेला आहे.

(५) मौजे कपिलधारवाडी, ता. जि. बीड येथील बाधित नागरिकांचे पुनर्वसन करुन त्याठिकाणी नागरी सुविधा पुरविण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाद्वारे (DDMA) मार्फत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (MHADA) छत्रपती संभाजीनगर यांना दिनांक १७ नोव्हेंबर, २०२५ अन्वये प्रस्ताव सादर केलेला आहे. प्रकरणामध्ये शासन निर्णय क्र. एफएलडी-२०१९/प्र.क्र.१२९/र-१२, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ अन्वये आपत्तीप्रवण गावाचे पुनर्वसनाची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शालार्थ आयडी आणि बनावट शिक्षक भरतीमधील गैरव्यवहाराबाबत

**(१६) * १५६९४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नागपूर येथील शालार्थ आयडी आणि बनावट शिक्षक भरती घोटाळा प्रकरणी पुण्याचे अतिरिक्त आयुक्त श्री. पुलकुंडवार यांचे नेतृत्वाखाली एसआयटी चौकशी करण्याचा निर्णय दिनांक ७ ऑगस्ट, २०२५ रोजी वा त्यादरम्यान शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूरमध्ये बनावट शालार्थ आयडी वापरून पगार घेणाऱ्या अनेक आरोपींवर गुन्हा नोंदवून अटक केली नसल्याने शासनाचे सुमारे १,००० कोटी रुपयांहून अधिक आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, मुंबईतील विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई कार्यरत असलेल्या श्री.संदिप संगवे यांनी शालार्थ आयडीत व शिक्षक समायोजनात मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याप्रकरणी शासनाने दिनांक ३ जुलै, २०२५ अन्वये नेमलेल्या एकस्तर विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, मुंबई यांनी श्री.संगवे यांचे विरुध्द प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, दोनवेळा मुदतवाढ दिली असली तरी अद्यापही चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात आला नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, या प्रकरणी चाळीसगाव येथे तीन गुन्ह्यांची नोंद झाली असून पोलीस विभागाद्वारे सर्वच जिल्ह्यातील दाखल होणाऱ्या गुन्ह्याची एकत्रित चौकशी करण्यासाठी एसआयटी गठित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, काही जिल्ह्यांमध्ये बनावट शालार्थ आयडी तयार करून शासनाकडून शाळांना देण्यात येणाऱ्या अनुदान व शिष्यवृत्ती निधीतून शिक्षणाधिकारी श्री. कुंभार व श्री.काळुसे यांनी १०० कोटी रुपयांचा व श्री. निलेश बाबुराव वाघमारे यांनी सव्वाशे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे बनावट आयडी तयार करुन त्यांचे वेतन व थकबाकी काढून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह शालार्थ आयडी व बनावट शिक्षक भरती रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे.

(५) अंशत: खरे आहे.

(६) शासन निर्णय दिनांक ०७ ऑगस्ट, २०२५ अन्वये राज्यातील अपात्र शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नावे नियमबाह्यरित्या समाविष्ठ करुन वेतन अदा केल्यासंदर्भात प्राप्त तक्रारींची चौकशी करण्यासाठी विशेष चौकशी पथकाची (एसआयटी) स्थापना करण्यात आलेली असून सदर पथकाचे काम प्रगतीपथावर आहे. शालार्थ आयडी प्रदान करताना पारदर्शकता येण्यासाठी आधार लिंक्ड मोबाईल ओटीपी चा वापर, ई-ऑफिस प्रणालीचा वापर,

संच मान्यतेसाठी एपीआयचा वापर करुन शाळानिहाय पोस्ट मॅपिंग प्रक्रिया इ. चा वापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच, याअनुषंगाने शालार्थ आयडी प्रदान करताना अनुसरावयाच्या कार्यपद्धती संदर्भात शिक्षण आयुक्तालयाचे परिपत्रक दिनांक २१ मार्च, २०२५ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितींच्या आवारात "शेतकरी भवन" बांधण्याबाबत**

**(१७) * १६६८०   श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात शेतकऱ्यांना मुक्कामाची सोय आणि मुलभूत सुविधा उपलब्ध होण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेस दोन वर्षांपासून मुदतवाढ देण्याचा निर्णय शासनाने माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेंतर्गत कुर्डूवाडी बाजार समिती (जि.सोलापूर) येथे शेतकऱ्यांसाठी नवीन शेतकरी भवन इमारत बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पणन व राज्यशिष्टाचार मंत्री यांचेकडे माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अस्तित्वात असलेल्या शेतकरी भवनांची दुरुस्ती करण्यासाठी व नवीन ११६ बाजार समित्यांमध्ये "शेतकरी भवन" बांधण्यासाठी १३२.४८ कोटी रुपये निधीस मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अस्तित्वात असलेल्या शेतकरी भवनांच्या दुरुस्तीबाबत व नवीन "शेतकरी भवन" बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक १९ डिसेंबर, २०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेस शासन निर्णय दिनांक ८ ऑक्टोबर, २०२५ अन्वये सन २०२६-२७ व सन २०२७-२८ या दोन आर्थिक वर्षासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर निवेदन अभिलेखामध्ये आढळून आलेले नाही. कृषि उत्पन्न बाजार समिती, कुर्डूवाडी, जि.सोलापूर येथे नवीन शेतकरी भवन बांधण्याबाबतचा प्रस्ताव पणन संचालक यांनी दिनांक २६ जुलै, २०२४ रोजी शासनास सादर केला होता. तथापि, सदर प्रस्तावामध्ये काही त्रुटी आढळून आल्याने दिनांक १० सप्टेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये त्रुटींची पूर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव शासनास फेरसादर करण्याबाबत पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने कृषि उत्पन्न बाजार समिती, कुर्डुवाडी यांनी दिनांक २५ नोव्हेंबर, २०२५ च्या पत्रान्वये कृषि उत्पन्न बाजार समिती कुर्डुवाडी या बाजार समितीच्या उपबाजार मोडनिंब मध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेअंतर्गत शेतकरी भवनाचे बांधकाम करण्यासाठी बाजार समिती तयार असून बाजार समितीच्या मासिक सभेमध्ये विचारविनिमय करुन आवश्यक तो प्रस्ताव सादर करीत आहोत असे पणन संचालनालयास कळविले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेअंतर्गत नवीन शेतकरी भवन बांधण्यासाठी रु. १०३.९८ कोटी व अस्तित्वातील शेतकरी भवनाच्या दुरुस्तीसाठी रु. २८.५० कोटी याप्रमाणे एकूण १३२.४८ कोटी इतक्या निधीच्या प्रस्तावास दिनांक १९ डिसेंबर, २०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) शेतकरी भवन योजनेअंतर्गत पणन संचालनालयाकडून प्राप्त एकूण ९५ प्रस्तावांपैकी परिपूर्ण ६८ प्रस्तावांना शासन स्तरावरुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील हडपसर परिसरात पाटबंधारे विभागाने भाडेपट्टा कराराने घेतलेल्या जागेची परस्पर विक्री केल्याबाबत

**(१८) * १७४९४ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील हडपसर परिसरात पाटबंधारे विभागाने ३० वर्षांच्या भाडेपट्टा कराराने ७३ हेक्टर जागा सुभाष सामुदायिक सहकारी शेतकरी संघ लि. या संस्थेला दिली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जागेची मुदत संपल्यानंतर या संस्थेने ही जागा परस्पर विकल्याचे लेखापरिक्षण अहवालात माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे शहरातील हडपसर परिसरात पाटबंधारे विभागाने ६१.६० हेक्टर क्षेत्र (१५४ एकर) शेतजमीन, सुभाष सामुदायिक सहकारी शेतकी संघ लि. संस्थेस सन १९८५ वर्षी ३० वर्षे खंडाने दिलेली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर संस्थेच्या जागेच्या खंडाची मुदत संपल्यानंतर या संस्थेने ही जागा परस्पर विकण्याचा घाट घातल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही. सदर संस्थेच्या सन २०२४-२५ च्या लेखापरीक्षण अहवालानुसार, जमीनीच्या खंडाची मुदत संपल्याने मुदतवाढ अथवा नवीन करारनामा करण्याबाबत संस्थेकडून कार्यवाही सुरु आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठातील शासन अनुदानित पदावरून निवृत्त झालेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन अदा करण्याबाबत

**(१९) * १७६८६ श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.अमिन पटेल**

**(मुंबादेवी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील शासन अनुदानित पदावरून निवृत्त झालेले १२७ शिक्षकेतर कर्मचारी सन २०१७ पासून निवृत्तीवेतनाच्या प्रतिक्षेत असल्याने या कर्मचाऱ्यांची व त्यांच्या कुटुंबियांची मोठ्या प्रमाणात उपासमार होऊ लागली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १२७ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी बारा कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला असून काही कर्मचारी आजाराशी झुंज देत असल्याने या कर्मचाऱ्यांचे जीवन उध्वस्त होत असतानाही निवृत्तीवेतन देण्यास दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे निवृत्तीवेतन तात्काळ अदा करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) याबाबत मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर प्रकरणी संचालक, उच्च शिक्षण पुणे यांना योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील शेतकऱ्यांच्या पीक कर्जासाठी बँकाकडून पुनर्भरण योजना राबविण्याबाबत

**(२०) * १५७१७ श्री.निलेश राणे (कुडाळ) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) रत्नागिरी जिल्हयातील बहुतांशी शेतकऱ्यांनी पीक कर्जाचे हप्ते भरले नसल्याने त्यांना नव्याने कर्ज मिळत नाही याकरिता कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा नियमित कर्ज पात्रतेत आणण्यासाठी विविध बँकाकडून पुनर्भरण योजना राबविली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही बँका या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करत नसल्याने अशा बँकांच्या असहकारी धोरणाचा कर्जदारांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एक रकमी रक्कम भरणे अशक्य असल्याने काही शेतकरी या योजनेपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मागील वर्षी जिल्हयातील फक्त तीन टक्के शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर पुनर्भरण योजना राबवित नसलेल्या संबंधित बँकांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) ते (५) हे खरे नाही.

सन २०२४-२५ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रत्नागिरी, राष्ट्रीयकृत बँका व ग्रामीण बँक यांनी अनुक्रमे रु. ८६१७.७३ लाख, रु.५४४२९.२३ लाख, व रु. ५६८६.०० लाख इतक्या रकमेचे खरीप व रब्बी हंगामाकरीता पीक कर्ज वाटप केले आहे. तसेच सन २०२५-२६ या हंगामाकरीता माहे ऑक्टोबर, २०२५ अखेर अनुक्रमे, रु. ७२७१.६२ लाख, रु. ४१५८८ लाख व रु. ५११३ लाख इतक्या रकमेचे पीक कर्ज वाटप केले आहे.

शेतकऱ्यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रत्नागिरी, राष्ट्रीयकृत बँका, तसेच महाराष्ट्र ग्रामीण बँक यांचेमार्फत वाटप करण्यात येणारे पीक कर्ज हे भारतीय रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार वाटप करण्यात येते.

जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी यांचेकडे रत्नागिरी जिल्ह्याच्या तालुक्यांमधील बँकांनी शेतकऱ्यांना पीक कर्जापासून वंचित ठेवल्याची कोणतीही तक्रार शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेली नाही. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, रत्नागिरी, राष्ट्रीयकृत बँका तसेच महाराष्ट्र ग्रामीण बँक यांचेमार्फत पीक कर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांना पुन्हा नियमित कर्ज पात्रतेत आणण्यासाठी पुनर्भरण/पुनर्गठन योजना राबविण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील शाळेतील विद्यार्थ्यांना**
**शैक्षणिक साहित्य पुरवठा करणेबाबत**

**(२१)** * **२०७५४ श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील शाळेतील विद्यार्थ्यांचे शालेय साहित्य अतिवृष्टीमुळे खराब झाले असून अनेक विद्यार्थ्यांचे काही शालेय साहित्य पुरात वाहून गेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद, नगरपालिका, खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित, शाळेतील विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत पुस्तके वाटप करण्यात आलेले असून ते अतिवृष्टीमुळे खराब झाल्याने, तर काही साहित्य वाहून गेल्याने सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता शासनाकडून पुन्हा नव्याने तात्काळ पुस्तके व आवश्यक ते शैक्षणिक साहित्य पुरवठा करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या स्तरावरून केलेल्या आवाहननुसार विविध सामाजिक संस्था, खाजगी क्षेत्रातील कंपन्या, उद्योजक, समाजातील दानशूर व्यक्ती, शिक्षक व कर्मचारी संघटना, शैक्षणिक संस्था यांच्याकडून मदत स्वरुपात आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य पुरेशा प्रमाणात विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच, मागील वर्षाची जुनी पाठयपुस्तकेही उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुण्यातील बाणेर येथील वक्फ बोर्डाच्या जमीनीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(२२) * १८२४४ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **अल्पसंख्याक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील बाणेर येथील वक्फ बोर्डाची ७ हेक्टर ३४ गुंठे (१८ एकर १४ गुंठे) जमिनीचा १९ वर्षांपूर्वी झालेला बेकायदेशीर व्यवहार ज्या किंमतीला रद्द करण्यात आला होता, त्याच किंमतीला वैध करुन विकण्यास वक्फ बोर्डाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २७ मे, २०२५ रोजी वा त्या दरम्यान परवानगी दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला वर्ग ३ ची जमीन वर्ग १ मध्ये करण्याचे कुठलेही अधिकार नसतानाही अध्यक्ष अथवा सीईओ यांनी पदाचा गैरवापर करुन पॅनसिया हिल सोसायटीच्या विकासकास सदरहू जमीन एका भूमाफीयाद्वारे विक्री करण्यात आल्याचे दिनांक २७ मे, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वक्फ बोर्डाच्या जमिनीबाबत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. माणिकराव कोकाटे :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

तत्कालीन वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतूदीनुसार सन २००६ मध्ये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने पुण्यातील बाणेर येथील ७ हे. ३४ आर. इतकी मिळकत विक्रीची परवानगी दिलेली आहे. सदर परवानगीचे आदेश कोणत्याही सक्षम न्यायालयाने रद्दबातल ठरविलेले नाही. सदर परवानगी सन २००६ मध्येच देण्यात आलेली असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यास दिनांक २७ मे, २०२५ रोजी परवानगी दिल्याची बाब खरी नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थीनींच्या शैक्षणिक शुल्क सवलतीबाबत

**(२३) * १९४०५ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२५-२६ मध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना शासन निर्णयानुसार मोफत शिक्षण शुल्काचा लाभ मिळणे अपेक्षित असताना काही विद्यार्थिनींना स्पॉटराऊंड किंवा इतर प्रवेश टप्प्यात प्रवेश मिळाल्यानंतर शैक्षणिक शुल्क माफीच्या लाभापासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रमाणे विद्यार्थीनींना प्रवेशानंतर शुल्क माफीची प्रक्रिया न झाल्याने त्यांना शुल्क भरावे लागल्याने आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ऑनलाईन प्रणालीत विद्यार्थीनींना जर चांगला दर्जा नसलेल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला तर कॅपराऊंड १ ते ४ मध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होत नसल्याने विद्यार्थीनींना त्याच कॉलेज मध्ये शिक्षण घेणे किंवा शिक्षण बंद करणे हाच पर्याय त्यांच्या समोर उपलब्ध होत असल्याच्या तक्रारी विद्यार्थीनींनी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील मुलींना शैक्षणिक शुल्क सवलत मिळणेसह शुल्क भरलेल्या विद्यार्थिनींना शासनाकडून संपूर्ण शुल्क परतावा (Reimbursement) मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक ०७ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार, या विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये राबविण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (व्यवस्थापन कोट्यातील/संस्था स्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय/ आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना" राबविण्यात येते. सदर योजनेंतर्गत मुलांना शिष्यवृत्तीकरीता शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क रकमेच्या ५० टक्के लाभ देण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमास, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) विद्यार्थीनींना सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास या विभागाच्या दिनांक ८ जुलै, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेशित विद्यार्थीनींना मोफत शिक्षण शुल्काचा लाभ देण्यात येतो.

तथापि, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्यतिरिक्त अगेन्स्ट कॅप अथवा संस्थास्तरावर प्रवेशित झालेल्या विद्यार्थीनींना सदरहू मोफत शिक्षण शुल्क योजना लागू नाही.
(३) व (४) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संपन्न झाल्यानंतर रिक्त राहिलेल्या तसेच संस्थास्तरावर उपलब्ध असलेल्या जागांवर प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनींना या विभागाचे मोफत शिक्षण शुल्काचे धोरण लागू नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उंडणगांव (ता. सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर) लघु सिंचन प्रकल्पाच्या भिंतीची दुरुस्ती करणेबाबत

**(२४) * १७२७४ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे. उंडणगांव (ता.सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील लघु सिंचन प्रकल्पाच्या भिंतीवर मोठ्या प्रमाणावर झाडे उगवली असून या झाडांच्या मुळांमुळे भिंतीला तडे जाऊन तलाव फुटण्याचा धोका निर्माण झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होऊन उडणगांव गावालाही धोका निर्माण होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शेतकऱ्यांनी लघु सिंचन प्रकल्पाच्या भिंतीवर वाढलेली झाडे तोडण्याची मागणी संबंधित सिंचन विभागाकडे माहे जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर, २०२५ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाकडून भिंतीवरील झाडे काढून टाकणे, भिंतीची तपासणी करणे व आवश्यक दुरुस्ती करून संभाव्य धोका टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) सद्य:स्थितीत उंडणगांव लघु प्रकल्प ता. सिल्लोड च्या धरण भिंतीवर झाडे झुडपे काही प्रमाणात झालेली आहे. तथापि प्रकल्पाच्या भिंतीवर पाहणी केली असता तडे अथवा भेगा निदर्शनास आल्या नाही. त्यामुळे सद्य:स्थितीत धरण सुरक्षित आहे.
(२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे. स्थानिकांनी झाडे तोडणेबाबत तोंडी मागणी केली आहे.
(४) सदर प्रकल्पावर गेल्या वर्षी माहे एप्रिल, २०२४ मध्ये यांत्रिकी विभागाद्वारे झाडे झुडपे तोडून धरणभिंतीची साफ सफाई करण्यात आली होती. तसेच यावर्षी देखील वार्षिक पाखरण कार्यक्रम अंतर्गत उंडणगांव लघु प्रकल्पाच्या भिंतीवरील झाडे झुडपे तोडण्यासाठी यांत्रिकी विभागाकडून मशीनची मागणी करण्यात आलेली असून, सद्य:स्थितीत रब्बी हंगामाची तयारी करण्यात येत असल्यामुळे कालव्याची दुरूस्ती चालू आहे. त्यानंतर प्राधान्याने उंडणगांव लघु प्रकल्पावरील झाडे झुडपे काढण्याचे काम नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थ्यांच्या अपार आयडी प्रणालीतील अडचणी टाळण्याकरिता करावयाच्या उपाययोजनांबाबत

**(२५) * १६०८८ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील तब्बल १ लाख १९ हजार विद्यार्थ्यांचे अपार आयडी विविध अडचणींमुळे अद्याप निर्माण न झाल्याचे अपार स्टेटस अहवालातून शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण विभागाच्या तांत्रिक अडचणी, मोबाईल नंबर बदलणे, शाळांकडून माहिती अद्ययावत न करणे यांसारख्या कारणांमुळे विद्यार्थ्यांना शासकीय शिष्यवृत्ती मिळण्यास अडचण येत असल्यामुळे शाळांनी दिलेले बोनाफाईड प्रमाणपत्र शासनाने मान्य करावे अशी शिक्षक व मुख्याध्यापकांची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांचे ‘अपार आयडी’ त्वरित निर्माण करुन विद्यार्थ्यांना वेळेवर शिष्यवृत्ती वितरित करण्याबाबत व भविष्यात अशा प्रकारच्या अडचणी टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) दिनांक ०१ डिसेंबर, २०२५ रोजीच्या यु-डायस प्लस प्रणालीमधील अहवालानुसार १,०८,४८३ विद्यार्थ्यांचे अपार आयडी विविध अडचणींमुळे अद्ययावत झाले नाहीत.
(२) यु-डायस प्लस प्रणालीवरील अहवालानुसार ८४.३९% विद्यार्थ्यांचे अपार आयडी काढण्याचे काम पूर्ण झालेले आहे. यु-डायस प्लस प्रणालीमधून ज्या विद्यार्थ्यांचे अपार आयडी काढण्याची कार्यवाही पूर्ण झालेली नाही अशाकरीता तांत्रिक अडचण / मोबाईल नंबर / नाव / जन्म तारीख आधार कार्ड प्रमाणे अद्ययावत करण्यासाठी यु-डायस प्लस प्रणालीमध्ये मुख्याध्यापकांना सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. “अपार

आयडी अद्ययावत नाही” या कारणास्तव कोणत्याही विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित ठेवण्यात येत नाही.

(३) विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढलेले नाही किंवा दुरूस्ती करावयाचे आहे, त्याकरिता शासन स्तरावरून दिनांक ०९ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रानुसार पोस्ट ऑफिस कार्यालयामार्फत आधार मशिन व ऑपरेटर प्रत्येक तालुक्यामध्ये उपलब्ध करून दिलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेचा लाभ पात्र शेतकऱ्यांना मिळणेबाबत**

**(२६) * १५९११ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.सिध्दार्थ खरात (मेहकर), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा), श्री.संजय देरकर (वणी), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री. बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांना लाभ देण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने सन २०२२ मध्ये देऊनही अद्यापी ६ लाख ५६ हजार शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेचा लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांना योजनेचा लाभ देण्यासाठी सुमारे ५,९०० कोटी रुपयांचा निधी लागणार असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात शेतकरी आत्महत्या आणि कर्जबाजारीपणा वाढत असताना शेतकरी संघटनांनी शेतकऱ्यांचे व शेतमजुरांचे संपूर्ण कर्ज माफ करून ७/१२ कोरा करण्याची मागणी दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ रोजी वा त्या दरम्यान केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी (पीक कर्ज, मध्यम मुदतीचे कर्ज तसेच सावकारी/मायक्रो फायनान्स कर्जे) करुन शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) होय.

(२) होय.

छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत पात्र ठरलेल्या उर्वरीत ६.५६ लाख कर्जखात्यांना लाभ देण्यासाठी रु. ५९७५.५१ कोटी निधीची आवश्यकता आहे.

(३) होय.

(४) राज्यातील शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत कर्जाच्या विळख्यातून सोडवणूक करण्यासाठी अल्पकालीन व दीर्घकालीन उपाययोजना करण्याबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चाधिकार समिती गठीत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांना आधारकार्ड उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२७) * १६००६ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.सचिन पाटील (फलटण), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमधील विद्यार्थ्यांची नोंदणी युडायस प्लस (UDISE+) पोर्टलवर आधार कार्डच्या वैधतेच्या आधारे करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विविध माध्यमांच्या शाळांत एकूण २.४ कोटी विद्यार्थ्यांपैकी ९३.५१ टक्के विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण पूर्ण झाले असून उर्वरित ५ लाख २७ हजार विद्यार्थ्यांकडे आधार कार्ड नाहीत, तर ७ लाख ३७ हजार ४८५ विद्यार्थ्यांचे आधार अवैध ठरल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू विद्यार्थ्यांना शाळाबाह्य मानल्यास त्यांच्या शैक्षणिक वर्षावर व पुढील प्रवेश प्रक्रियेवर होणारा परिणाम रोखण्यासाठी अवैध आधार कार्डची पडताळणी करण्याकरिता शिक्षण विभागाकडून राज्यभरात विशेष शिबिरे राबविण्यात येणार असल्याची माहिती विभागाने दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध ठरलेल्या आधार कार्डमधील त्रृटी दूर करून विद्यार्थ्यांना आधारकार्ड उपलब्ध करुन देण्याबाबत, तसेच आधारकार्ड उपलब्ध नसलेल्या विद्यार्थ्यांना आधारकार्ड मिळवून देण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) राज्यातील इ. १ ली ते इ. १२ वी पर्यंतच्या विविध माध्यमाच्या शाळांमधून सुमारे २ कोटी १२ लाख इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर विद्यार्थ्यांपैकी ९४.९० टक्के इतक्या विद्यार्थ्यांचे आधार प्रमाणिकरण झाले असून प्रलंबित विद्यार्थी संख्या १०,९९,१४५ इतकी आहे.

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) यांनी दिलेल्या सुचनांनुसार विद्यार्थ्यांच्या वयाच्या ५ व्या व पुन्हा १५ व्या वर्षी बायोमॅट्रीक अपडेट करणे बंधकारक असल्याने देशांतील सर्व शाळांना आवाहन केले आहे. त्यानुसार, विद्यार्थ्यांचे आधार नोंदणी अथवा इतर काही कारणास्तव त्रुटी असणाऱ्या आधार नोंदणीसाठी आधार प्राधिकरण यांच्या मदतीने राज्यात मोठ्या प्रमाणात शिबीरे आयोजित करण्यात येत आहेत. आधार नोंदणी किंवा अद्ययावत न झालेल्या विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कोणत्याही योजनेपासून वंचित ठेवण्यात येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमधील मध्यान्ह भोजन योजनेत कंत्राटदारांनी केलेला गैरव्यवहार

**(२८) * १५५८५ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमध्ये मुलांना पुरविण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजनातील विषबाधा रोखण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने मार्गदर्शक सूचना देऊनही या सूचनांची अंमलबजावणी करण्यात येत नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच, मा. न्यायालयाच्या निदेशानुसार शाळांतील इयत्ता अन्नाच्या तपासणीसाठी अन्न निरीक्षकांची (फुड इन्स्पेक्टर) नियुक्ती करण्याचे आदेश देऊनही त्यांची नियुक्ती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मुंबई महानगरपालिका शाळांतील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत २० संस्थाकडून बनावट कागदपत्रांच्या आधारे कंत्राट देऊन ३६४ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे ऑगस्ट - सप्टेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन योजनेच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणी दूर करण्यासह संबंधित दोषी कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) शाळांमधील अन्न पदार्थांच्या तपासणीसाठी फुड इन्स्पेक्टर (अन्न सुरक्षा अधिकारी) यांची नियुक्ती करण्याचे निर्देश मा.न्यायालयाकडून अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झाले नाहीत. तथापि, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ अंतर्गत अन्न सुरक्षा अधिकारी हे त्यांच्या कार्यक्षेत्राात आवश्यकतेनुसार मध्यान्ह भोजन योजनेतील अन्न पदार्थांचे नमुने तपासणीसाठी घेत असतात.
(३) व (४) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका स्तरावर चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीच्या अहवालानुसार खोटी कागदपत्रे सादर केलेल्या व प्रक्रीयेदरम्यान काळया यादीत नाव असलेल्या एकूण ४ संस्थांची नियुक्ती तात्काळ रद्द करून दिनांक ०१ फेब्रुवारी, २०२५ पासून त्यांच्या जागी प्रतिक्षा यादीतील संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, उर्वरित पात्र संस्थांच्या कागदपत्राच्या पडताळणीअंती कार्यरत असणाऱ्या संस्थांपैकी अन्य ६ संस्था व प्रतिक्षा यादीतील २ संस्था अपात्र ठरत असल्यामुळे त्यांच्यावर नियमोचित कारवाई सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांचे विकासकांनी अभिहस्तांतरण (कन्व्हेएन्स) करणेबाबत

**(२९) * १५९५३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यातील पुनर्विकास करुन नोंदणी केलेल्या सुमारे ६३ हजार सहकारी गृहनिर्माण संस्थांना विकासकांनी अद्याप इमारतीच्या जागेचे गत १५ ते २० वर्षांपासून अभिहस्तांतरण (कन्व्हेएन्स) करुन दिले नसल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र फ्लॅट ओनरशिप ॲक्ट १९६३ चे कलम ११ प्रमाणे सोसायटीची नोंदणी करणे व त्यानंतर चार महिन्यांत जमीनीसह इमारतींचे सोसायटीकडे अभिहस्तांतरण (कन्व्हेएन्स) करुन देण्याची तरतूद असतानाही अद्याप अभिहस्तांतरणाची कार्यवाही करण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईसह राज्यात एकूण पुनर्विकास केलेल्या नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थाची एकूण संख्या किती आहे व माहे नोव्हेंबर, २०२५ अखेरपर्यंत किती सहकारी गृहनिर्माण संस्थेला शासनाने विकासकांतर्फे अभिहस्तांतरण प्रक्रिया पूर्ण केली आहे,

(४) असल्यास, उर्वरित सहकारी गृहनिर्माण संस्थांची अभिहस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण न करणाऱ्या विकासकांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाबासाहेब पाटील :** (१) नाही.

सहकारी गृहनिर्माण संस्थांचा पुनर्विकास करुन पुन्हा नोंदणी करण्यात येत नसून, पुनर्विकास केलेल्या संस्थेमध्ये जे नवीन सदनिकाधारक आहेत, त्यांना मूळ संस्थेकडून सभासद करुन घेण्यात येते. त्यामुळे पुनर्विकास करुन नोंदणी केलेल्या सुमारे ६३ हजार सहकारी गृहनिर्माण संस्थांना विकासकांनी इमारतीच्या जागेचे अभिहस्तांतरण करुन दिले नसल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, राज्यात एकूण १,२६,५४४ नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था असून, म्हाडाअंतर्गत संस्था, शासकीय जमीन व प्लॉट धारकांच्या संस्था अशा संस्थांना मानीव अभिहस्तांतरण करण्याची आवश्यकता नसलेल्या संस्था १२,०३५ एवढ्या आहेत.

तसेच माहे नोव्हेंबर, २०२५ अखेर राज्यातील मानीव अभिहस्तांतरण दिलेल्या संस्थांची संख्या २६,३३८ इतकी असून, अभिहस्तांतरण न झालेल्या एकूण सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्या ९०,९४७ एवढी आहे. तसेच सद्य:स्थितीत ९७९ प्रकरणांबाबत मानीव अभिहस्तांतरणाची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र मालकी हक्कांच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम, १९६३ च्या कलम १३ (अ) नुसार, संबंधित संस्था अभिहस्तांतरणाची कार्यवाही पूर्ण न करणाऱ्या विकासकाविरुध्द मा. न्यायालयामध्ये अर्ज करुन दाद मागण्याची तरतूद आहे.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील सीना-माढा उपसा सिंचन योजनेसाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देणेबाबत

**(३०) * २०७६७ श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील सीना-माढा उपसा सिंचन योजनेला सन १९९४ मध्ये ५४ कोटींची प्रशासकीय मान्यता मिळून जवळपास ३१ वर्षांचा कालावधी उलटून गेला तरी अद्याप शेतकऱ्यांना हक्काच्या पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमीनी दिल्या त्या ३५० हून अधिक शेतकऱ्यांना अद्याप जमीनीचा मोबदला मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेचे पाणी शेतकऱ्यांना वाटप करण्याच्या तसेच संपादित जमिनीचा मोबदला अदा करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) होय, अंशत: खरे आहे.

सीना-माढा उपसा सिंचन योजनेकरीता संपादित करावयाच्या एकूण ९५४.२७ हे. क्षेत्रापैकी माहे ऑक्टोबर, २०२५ अखेर सुमारे ७३१.७४ हे. इतके क्षेत्र संपादित करून शेतकऱ्यांना मोबदला वितरीत केला आहे. उर्वरीत २२२.८० हे.क्षेत्र थेट खरेदीद्वारे संपादित करून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मोबदला वाटपाचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(३) सीना-माढा उपसा सिंचन योजनेचा रू. ९६२ कोटी किंमतीचा तृतीय सुप्रमा प्रस्तावावर क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे. सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर उर्वरीत १५७८ हे. क्षेत्राची सिंचन निर्मिती करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे बसविण्यासह इतर सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३१) * १५५८६ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.हरिश्चंद्र भोये (विक्रमगड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्रीमती रंजनाताई (संजना) जाधव (कन्नड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वच शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शैक्षणिक वर्ष सुरु होण्याआधी सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे बसविण्याचे निदेश मा. उच्च न्यायालयाने राज्य शासनाला दिल्यानुसार शालेय शिक्षण विभागाने दिनांक १३ मे, २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ४५३१५ सरकारी व १११३९ खाजगी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नसणे, २५१५० सरकारी व १५६७५ खाजगी शाळांमध्ये कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी पडताळणी केली नसणे, १७६५१ सरकारी तर ९३३३ खाजगी शाळांमध्ये अभ्यांगत नोंदणी / आचारसंहिता नसणे, २२६६ सरकारी तर ३२३१ खाजगी शाळांमध्ये शाळा सुरक्षा समितीच नसणे व १२१०४ सरकारी व १०७८९ खाजगी शाळांना "पोक्सो" कायद्याच्या तरतुदी कळविल्या नसणे या बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासह सुरक्षा समित्या, तक्रार पेट्या, सखी सावित्री समिती व इतर सोयी सुविधांची कमतरता असल्यामुळे शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, पालघर जिह्यात सीसीटीव्ही कॅमेरे खरेदी प्रक्रीया राबविण्याकरिता व्हीजेटीआय या संस्थेमार्फत या कामासाठी तांत्रिक मान्यता घेऊन जिल्ह्यातील ३८ शाळांसाठी साडे तीन कोटींचे काम मंजूर केले असून जेम पोर्टलवर कॅमेऱ्याच्या प्रत्येक संचाची किंमत दोन ते तीन लाख रुपये असताना हाच संच ९ ते १० लाख रुपयांनी खरेदी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, अमरावती जिल्ह्यात जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी २ कोटी २८ लाख रुपयांचा निधी मंजूर करुन पुणे येथील 'सुपर' या कंपनीकडे काम सोपविण्यात आले असतांना सदर कंपनीने ते काम पूर्ण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील सर्व शाळांमध्ये मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही (CCTV) कॅमेरे बसविण्यासह विविध समित्या स्थापन करुन इतर सोयी-सुविधा उपलब्ध करण्याकरीता कार्यवाही करण्यासह संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक १३ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व शाळांमध्ये सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत निर्देश दिले आहेत.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

१) राज्यातील ६०,०४९ एवढया शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे असून त्यापैकी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या २०,९६० शाळांमध्ये, तसेच ३९,०८९ खाजगी शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे आहेत.

२) राज्यातील शाळांमध्ये कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी पडताळणी सुरु असून त्यापैकी शिक्षक संख्या ६२०९७ व शिक्षकेतर कर्मचारी यांची संख्या ३११०८ एवढी आहे.

३) राज्यातील ८१,६६४ शाळांमध्ये प्रवेशद्वारांवर अभ्यागतांचे प्रवेश निर्गमन नोंदवही ठेवण्यात आलेली आहे.

४) राज्यातील १,०३,८८९ शाळांमध्ये सखी सावित्री समितीचे गठण करण्यात आलेले आहे.

५) राज्यातील १,०३,७०३ शाळांमध्ये शिक्षक आणि पालकांना बालकांच्या हक्काबाबत, तसेच बालकांशी संबंधित बालन्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, POCSO कायदा, या कायदयाविषयी माहिती देण्यात आलेली आहे.

(४) पालघर जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याकरिता जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे रक्कम रुपये १४ कोटी ८४ लाख इतक्या निधीची मागणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी रुपये ३.६० कोटीची प्रशासकीय मान्यता सन २०२४-२५ मध्ये देण्यात आलेली आहे. सदर योजनेची निविदा प्रक्रिया व खरेदी ही जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय पालघर यांच्या स्तरावर राबविण्यात आली आहे.

(५) हे खरे आहे.

अमरावती जिल्ह्यातील २५५ शाळांमध्ये सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्याकरीता "सुपर कॉम्प्युटर" या संस्थेला आदेश देण्यात आलेले असून अद्यापपर्यंत ५५ शाळांमध्ये सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. तसेच, उर्वरीत शाळांमध्ये सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्याचे काम सुरु आहे. युडायसनुसार यापुर्वीच ८३ शाळांमध्ये सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत.

(६) दिनांक १३ मे, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाने राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये विदयार्थ्यांच्या सुरक्षा व सुरक्षिततेच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनांसंदर्भात सर्वसमावेशक सुचनांची अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले असून त्याप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.